
# छत्रपती शिवाजी महाराज : प्रशासन विषयक धोरण



# छत्रपती शिवाजी महाराज : प्रशासन विषयक धोरण


■ प्रथम आवृत्ती – १९, फेब्रुवारी २२



© प्रकाशक व संपादक



■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

ISBN- 978-93-91305-05-5



Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth Pin-431516, Ta.Sonpeth Dist.Parbhani



सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | रयतेचा राजा राजा शिवाजी — डॉ.काळे बी.एम | 1 |
| 2 | शिवकाळातील लष्करी प्रशासन — प्राचार्य. डॉ.अजय बी.पाटील | 6 |
| 3 | शेतकऱ्यांचे कैवारी - छत्रपती शिवाजी महाराज — डॉ.बळवंत विष्णू घोगरे | 15 |
| 4 | शिवकालीन प्रशासन :-एक दृष्टीक्षेप — डॉ. बी.आर.कतुरवार | 22 |
| 5 | छत्रपती शिवरायांचा स्त्रिविषयक दृष्टिकोन — डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे | 28 |
| 6 | छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती — वसुदेव प्रभु मुळीक | 37 |
| 7 | छ. शिवाजी महाराजांची प्रशासन व्यवस्था — डॉ. राम फुन्ने | 46 |
| 8 | शिवाजी महाराजांची प्रशासन व्यवस्था आणि अष्टप्रधान मंडळ — डॉ. सुधाकर नारायण भालेराव | 52 |
| 9 | छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन आणि त्यांच्या प्रशासनाची वैशिष्ट्ये — डॉ. बंजारा दिलीप लालू | 59 |
| 10 | शिवरायांचा स्त्री विषयक दृष्टीकोण — डॉ. ममता फुके | 66 |
| 11 | शिवकालीन इतिहास लेखनातील प्रवाह- एक ओळख — प्रा. नाजीर पठाण | 71 |
| 12 | छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ — प्रा. सुधाकर एस. हांगे | 77 |

# रयतेचा राजा राजा शिवाजी

डॉ.काळे बी.एम

मराठी विभाग, कै.र.व.म.सोनपेठ

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

'कुळवाडी भुषण' म्हणुन ज्यांचा गौरव जोतीराव फुलेंनी केला ते छत्रपती शिवाजी राजे हे जगाच्या इतिहासात होऊन गेलेल्या राजामध्ये उठून दिसतात. 'ये जातीचा जाला नाही, पुढे ही होणार नाही.' असे गौरवोद्गार बखरकरांनी ज्यांच्या बद्दल काढले त्यांच्या अनुषंगाने विचार करतांना एक 'रयतेचा राजा' म्हणुन शिवाजी राजे यांचे वेगळेपण आपल्या मनात भरते. तसे राजे खूप होऊन गेले, पण सर्व राजांची अशी आठवण केली जात नाही. त्या राजांच्या जयंत्या किंवा मंयत्या कोणी साजऱ्या करत नाही. शिवजयंती जितक्या विस्तृत प्रदेशात, जितक्या मोठया प्रमाणात आणि उत्साहाने, उमेदीने व स्फुर्तीने साजरी केली जाते तसे कुणाही राजाच्या बाबतीत घडत नाही.

इतर राजांपेक्षा या राजात काय वेगळेपण होते याचा शोध या शोधनिबंधात घेतला आहे. आपल्या समोर उभा केलेला शिवाजी. तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधणारा, सुरतेवर छापा टाकणारा, अफजलखानाचे पोट फाडणारा, शाहिस्तेखानाची बोटे तोडणारा, पेठाऱ्यातुन पसार झालेला, शिवराज्याभिषेक करणारा असा शिवाजी उभा केला जातो. पण यापेक्षाही शिवाजी 'माणूस' म्हणून किती मोठे होते. श्रेष्ठ होते याचे दर्शन त्यांच्या चरित्रातून घडते.

इतर राजांपेक्षा शिवाजी राजे याचे वेगळेपण पाहत असतांना आपल्या लक्षात येते की, शिवाजी राजे हे वारसाहक्काने गादीवर बसलेले राजे नव्हते. त्यांनी राज्य 'निर्माण' केले. ते राज्य संस्थापक होते. राज्य निर्माण करणे सोपे नसते. इतरांनी स्थापलेल्या राज्यावर 'आयातोबा' म्हणून बसणे आणि स्वकर्तृत्वार राज्य निर्माण करणे यात खूप फरक आहे शिवाजीने जेव्हा राज्य स्थापन केले तेव्हा यवनी अमलात दहाहजारी, वीसहजारी असे बलाढय मराठे सरदार होते. ते मोठमोठया जाहगीरीतच रममाण होते. त्या दरबाराची मर्जी राखावी, त्यासाठी लाचारी

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Sonpeth Dist Parbhani



सत्कीर्ती मिळवावी आणि कसे तरी करून इनाम मिळवावे यातच ते त्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता बाळगीत. पण शिवाजी राजे हे त्याला अपवाद होते. त्यांनी जनतेचे राज्य निर्माण करण्याचे स्वप्न पाहिले आणि प्रत्यक्षात उतरविले हा घटना जगाच्या इतिहासात दुर्मिळच म्हणावी लागेल.

शिवाजीच्या 'राज्या'च दुसर ठळक वैशिष्टय म्हणजे शिवाजीचे कार्य आणि शिवाजीच राज्य त्या राज्यात राहणाऱ्या सर्वसामान्य माणसाला आपले वाटत होते. त्यामुळेच स्वराज्यावर कितीतरी संकटे चालुन आली पण जनता स्वराज्याच्या बाजुनेच उभी राहिली. शिवाजीचे कार्य हे आपले कार्य आहे असे त्या काळातील रयतेला वाटत होते. याची कितीतरी उदाहरणे आपल्याला शिवाजीच्या इतिहासात दिसतात. सिद्धी जोहर अन फाजलखान यांनी पन्हाळगडाला वेढा दिला. सहा महिने झाले तरी वेढयात ढील पडत नव्हती. नेताजी पालकराने वेढयावर केलेल्या हल्ल्यात नेताजीचा पराभव झाला व त्यांना पळून जावे लागले. वेढयात अडकून पडलेल्या शिवाजी राजे यांना सुटकेचा मार्ग सापडत नव्हता. अशा वेळी वेढयातील पातळ जागा शोधून गुपचुपपणे रात्रीच्या वेळी विशालगडावर पळुन जाण्याचा बेत राजे शिवाजींनी आखला. या बेताचाच एक भाग म्हणून एक खोटा शिवाजी तयार करण्यात आला. पालखीत बसलेला शिवाजी सिद्धी जोहर अन फाजलखान यांना भेटेपर्यंत व त्याची खरी ओळख पटेपर्यंत शिवाजी राजे हे विशालगडावर निघून जातात. याठिकाणी सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे खोटा शिवाजी बनलेला माणुस हा एक सामान्य गरीब माणुस शिवा न्हावी होता. त्याला हे माहित होते की आपण पकडले जाणार आणि आपला खातमा होणार. तरीही तो बलिदानास तयार झाला. शत्रुच्या तलवारीने तो हसत हसत खतमही झाला. आपण मेलो तरी चालेल. पण शिवाजीने जे कार्य आंरभिले होते ते पूर्ण करायला शिवाजी राजे जगायला हवेत ही भावना त्याकाळी सर्व रयतेच्या मनात होती. शिवाजी राजे आणि स्वराज्यासाठी मृत्यूला सामोरे जायला जनता तयार होती. मदारी म्हेतर, हिरोजी फर्जंद, बाजीप्रभू, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, नेताजी पालकर, बहर्जी नाईक, काजी हैदर, अशी कितीतरी ज्ञात अज्ञात माणसे शिवचरित्रात पानोपानी सापडतात. आपण मेलो तरी

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516
चालेल, पण शिवाजी जगला पाहिजे असे वाटयला लागावे, अशी किमया फक्त शिवाजी राजेच करू शकले. इतर राजांना ते शक्य नव्हते शिवकाळामध्ये शिवाजी राजे सर्व सहकाऱ्यात, सर्व सैनिकात आणि सर्व रयतेत ते ही भावना निर्माण करू शकले ही गोष्ट सामान्य नाही. संपतीच्या लोभाने जे लढतात अन् मरतात त्यांची नोंद ठेवावी असे इतिहासाला वाटत नाही.

शिवाजीचे 'राज्य' हे लोकांना आपल 'राज्य' वाटत होत. शिवाजीराजेचा काळ हा संरजामशाहीचा काळ होता. देशमुख, पाटील, कुलकर्णी, देशपांडे हे सगळे वतनदार, जाहगीरदार सर्वसामान्य नाही. जनतेवर अन्याय करत असत. शेती पिको अथवा न पिको ते शेतकऱ्याकडून महसूल वसूल करीत असत. रयतेची संपती म्हणजे कुणीही लुटायची वस्तू अशी त्याकाळी रीत होती. सारख्या लढाया होत. पायदळ व घोडदळ हे सैन्य रयतेच्या उभ्या पिकातून धावत असे. त्यांच प्रचंड नुकसान होत असे. परंतू शिवाजी राजे यांनी ही वतनदारी, संरजामदारी मोडून काढली. 'रयतेच्या भाजीच्या देठालासुध्दा हात न लावण्याची' सक्ती आज्ञा शिवाजी राजेनी आपल्या सैनिकांना दिली होती. स्वराज्य संरक्षण करताना देखील सामान्य जनतेला जाच होऊ नये म्हणून शिवाजी राजे कमालीची काळजी घेतांना दिसतात. रामचंद्रपंत अमात्य यांच्या 'आज्ञापत्र' ग्रंथातून शिवाजी राजे यांचे रयतेसंबेधी असलेले प्रेम, मनाचा कोमलपणा व त्यांची सुक्ष्म दृष्टी आपल्या लक्षात येते.

मध्ययुगीन कालखंडात संरजामशाही होती. यांच्या काळात एकूणच गरीबांना व स्त्रीयांच्या अब्रुला फारशी किंमत नव्हती. त्यामुळे सरदार, वतनदार, जमीनदार, देशमुख, देशपांडे, कुलकर्णी, पाटील हे सर्वसामान्य स्त्रियांवर आत्याचार करीत असत. शिवाजी राजे यांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्त्री-पुरूष समतेचा होता. स्त्रियांच्या अब्रुसंबंधी ते फार जागरूक होते. रांझ्याच्या पाटलाची गोष्ट प्रसिद्ध आहे. राझ्यांच्या पाटलाने शेककऱ्याच्या मुलीवर अतिप्रसंग केला. त्यामुळे त्या मुलींने जीव दिला. सारा गाव हळहळला पण कुणी तक्रार केली नाही. शिवाजी राजे यांच्या कानावर ही गोष्ट आल्यानंतर त्यांनी त्या पाटलाना उचलुन आणले आणि सर्वांसमोर

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



त्यांचे हातपाय तोडले. वतनदार, पाटलांना शिक्षा झाल्यामुळे सर्व जनता राजे यांच्या पाठीशी होती. त्यांच्या कार्यासाठी ती मरायला पण तयार होती.

राजेंनी केवळ वतनदार, संरजमदारच नाही तर आपल्या सरदारांची सुद्धा स्त्रियांच्या बाबतीत गय केली नाही. १६७८ मध्ये सकुजी गायकवाड नावाच्या शिवाजी राजे यांच्या सेनापतीने बेळवाडीच्या किल्ल्यावर आक्रमण केले त्या किल्ल्याची किल्लेदार ही सावित्रीबाई देसाई होती. त्या स्त्रिने निकाराने झुंज दिली. पण शेवटी सकुजी गायकवाडाने तिचा पराभव केला. आणि विजयाच्या उन्मादाने तिच्यावर बलात्कार केला. ही गोष्ट राजेंना कळाल्यानंतर त्यांना प्रचंड राग आला. आणि त्यांनी सकुजी गायकवाडचे दोन्ही डोळे काढून त्याला मरेपर्यंत तुरूगांत टाकले. आपल्या विजयी सेनापतीने शत्रु असलेल्या स्त्रीवर बलात्कार केला म्हणून गय केली नाही.

'स्त्रियांची इज्जत कायम राहिली पाहिजे. मग ती कुणाही असो' ही राजे शिवाजी यांची भुमिका होती.

सामान्य गोरगरीब जनतेच्या लेकीसुनांच्या आब्रुसंबंधी जसा त्यांचा दृष्टीकोन होता. तसाच जनतेच्या संपतीसंबंधीही दृष्टीकोन वेगळा होता. त्याच्याकाळात सरंजामदार, वतनदान रयतेची संपती लुटत असत. त्यांचे पायदळ, घोडदळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असताना सामान्यांची लुट करत असत. अशाकाळात शिवाजी राजे यांनी 'रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये.' अशा नुसत्या आज्ञा दिल्या नाहीत तर त्याची सक्तीने अंमलबजावणी केली. याबाबात त्यांची जरब असे. कामात कुचराई केली की तो कोणीही असो त्याची कदापी गय होत नसे. त्यांचे 'जिवाजी विनायकास' पाठवलेले पत्र आज उपजब्ध आहे. जिवाजी विनायक हा मामाले प्रभावळीचा सुभेदार असाते. त्याला राजे दौलतखान व दर्यासांरग यांना आरमार तयार करण्यासाठी लागणाऱ्या वस्तू व पैसा पाठवण्याचे सांगतात पण तो ते काम करीत नाही. ही गोष्ट जेव्हा राजे यांना कळते तेंव्हा ते पत्रातून म्हणतात 'ब्राम्हण म्हणून कोण मुलाहिजा करू पाहतो?' तुम्ही स्वत:असे समजत असाल की मी ब्राम्हण आहे राजे माझ्यावर काही कारवाई

करणार नाहीत. तर ते साफ चुकिचे आहे. राजे त्याची जात, धर्म, लिंग, न पाहता कडक शासन करत असत त्यामुळे त्यांचा दरारा सर्वावर सारखा असे. त्यामुळे सर्व सामान्य जनता राजे यांच्या पाठीशी उभी राहिली मरणालाही तयार झाली.

शिवाजी राजे यांचे शुध्द चारित्र, दिलेल्या स्पष्ट आज्ञा, अज्ञेचा भंग करणाऱ्यांना जरब बसेल अश शिक्षा शेतकऱ्या मधुनच केलेली सैन्याची रचना, सर्वाकडे पाहण्याचा समतेचा दृष्टीकोन. यामुळे आजही लोकशाहीत शिवाजी राजे आणि त्यांची राजेशाही याचे कौतुक होते. खरे पाहता राजेशाही ही कलबाहय झालेली समाजरचना पण आजही राजे यांचा जो जयजयकार होतो. तो राजे यांच्या विचारात, व्यवहारात आणि चरित्रात असल्यामुळे गुणांमुळेच, त्यामुळेच राजे शिवाजी यांचे 'राज्य' हे लोकांचे होते. आपण लोकांचे लोकांसाठी चालवलेले शासन म्हणजे लोकशाही म्हणतो. शिवबाचे राज्य पण लोकांचेच राज्य होते. त्यामुळेच आपण शिवाजी राजे यांना 'रयतेचा राजा राजा शिवाजी असे म्हणतो.

**सदंर्भ ग्रंथ:-**

०१. मराठ्यांचा इतिहास- डॉ.गाठाळ

०२. शिवाजी कोण होता- गोविंद पानसरे

०३. आज्ञापत्र- रामचंद्रपंत आमात्य

**PRINCIPAL**
**Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani**